ISSN 2321-9572

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक - वर्ष २ रे • अंक १ला • सप्टेंबर - डिसेंबर -२०१४ • मूल्य १००रु.

*International Level Referred*



• संपादक •

कैलास गणपतराव कान्हिदे

Scanned by CamScanner

MAHMAR 42198/2013
ISSN 2321-9572

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all subjects*

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक • वर्ष 2 रे • अंक 1 ला • सप्टेंबर-डिसेंबर 2014

• संपादक : प्रा. कैलास कानिंदे •

• कार्यकारी संपादक •

डॉ.सिध्दार्थ जाधव (बीड)

मनोज गिमेकर (भोकर)

• सहसंपादक •

डॉ.सुभाष पवार (अमरावती)

प्रा.भारत कल्याणकर (अमरावती)

प्रा.संदिप गोरे (वसमत)

प्रा.व्यंकट कोरेबोईनवाड (जालना)

डॉ.बालाजी विजापुरे (भोकर)

प्रा. राहुल पंडित (जुन्नर)

प्रा.लक्ष्मण डोंगरे (हिमायतनगर)

प्रा.साईनाथ बनसोडे (औरंगाबाद)

प्रा. सुभाष रगडे (नांदेड)

प्रा.नामदेव डोंगरे (चिपळूण)

सामाजिक अनुसंधान त्रैमासिक अंकातील लेखकांची/संशोधकाची मते ही त्यांची वैयक्तिक असून त्याबद्दल मुद्रक, मालक, प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

टिप - कॉपीराईट विषयी आलेल्या तक्रारी बाबत संबंधित लेखांचे संशोधक, लेखक जबाबदार असतील. मुद्रक,मालक, प्रकाशक, संपादक मंडळ जबाबदार राहणार नाहीत.

"सामाजिक अनुसंधान" हे त्रैमासिक मुद्रक मनोहर दिगांबर जोंधळे यांनी मालक, प्रकाशक, संपादक कैलास गणपतराव कानिंदे यांच्याकरीता रोहिणी प्रिंटींग प्रेस, वैशालीनगर, प्लॉट नं.19, तरोडा (बु.) नांदेड 431605 येथे छापून कार्यालय "मुक्ताई निवास", वनक्षेत्र कार्यालयाजवळ, समतानगर,भोकर ता.भोकर जि. नांदेड - 431801. येथे प्रकाशित केले.

Scanned by CamScanner

<u>अनुक्रमणिका</u>


| अ. क्र. | शोध निबंधाचे शीर्षक | संशोधकाचे नाव | पृ.क्रं. |
|---|---|---|---|
| १ | भ्रष्टाचाराचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास | डॉ.बी.एम.कांबळे | १ |
| २ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा व पक्ष कार्यक्रम | प्रा. राहुल पंडित | ४ |
| ३ | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सहभाग | डॉ. विजापूरे बालाजी विठ्ठलराव | ११ |
| ४ | तृतीयपंथीयांच्या धार्मिक जीवन पध्दतीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास | कैलास कार्निदे | १३ |
| ५ | संत गाडगे बाबांच्या कीर्तनातून सामाजिक प्रबोधन | गिमेकर मनोजकुमार पंढरीनाथ | १७ |
| ६ | निवडणूक खर्च आणि निवडणूक सुधारणा | प्रा.डोंगरे एल.बी | १९ |
| ७ | स्वयंसेवी संस्था आणि आदिवासी समाजातील वास्तवता | बल्लोरे शिवाजी किशनराव | २२ |
| ८ | शेतकरी व शेतीचे प्रश्न | प्रा. डॉ. उध्दव थोरवे | २५ |
| ९ | महाराष्ट्रातील बलुता पध्दती : सातत्य आणि परिवर्तन | नागोराव रामा कांबळे | २७ |
| १० | विज्ञान साहित्य : संकल्पना आणि स्वरूप | प्रा. प्रकाश भरणे | ३१ |
| ११ | नीग्रो चळवळ आणि दलित चळवळ | प्रा.व्यंकट दिगंबर कोरेबोईनवाड | ३३ |
| १२ | पारधी जमातीचे जीवन आणि आरक्षण | प्रा. पंडित संभाजी वाघमारे | ३६ |
| १३ | भारतीय शासनातील भ्रष्टाचाराची समस्या | प्रा. नवसे डॉ.जी.कार्निदे के.जी. | ३८ |
| १४ | हिमायतनगर (वाढोणा)येथील मध्ययुगीन जलस्थापत्य आणि जलव्यवस्थापन | प्रा.डॉ.वसंत व्यंकटराव कदम | ४१ |
| १५ | मनरेगा योजना आणि आदिवासी लोकसहभाग | महेश आनंदराव मगर | ४६ |
| १६ | सेंद्रिय शेती आणि भाजीपाला उत्पादन एक अभ्यास | प्रा सागर आर चौगुले | ५० |


Scanned by CamScanner

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा व पक्ष कार्यक्रम

प्रा.. राहुल पंडित

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

श्री शिवछत्रपती महाविद्यालय जुन्नर

**प्रस्तावना:–** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अध्ययन चिंतनातून आणि जीवन अनुभवातून ठोस स्वरुपात जाणले होते की, राजकीय सुधारणे शिवाय सामाजिक सुधारणेस महत्त्व नाही. सर्व प्रकारच्या दास्यातून मुक्त व्हायचे असेल तर सत्ता प्राप्त केली पाहिजे. सत्ता प्राप्त करावयाची असेल तर राजकारण केले पाहिजे. येथिल वर्ण व्यवस्थेवर आधारित असलेली संस्कृती नष्ट केल्या शिवाय आणि संरजामशाही, भांडवलशाही नष्ट केल्या शिवाय दलित, शेतकरी, कामगार वर्गाचे राज्य प्रस्थापित करता येणार नाही. या शोषित वर्गाच्या शुद्ध वर्गिय हितसबंधावर आधारीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना १५ ऑगस्ट १९३६ साली केली. स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहिरनामा, ध्येय धोरणे आणि कार्यक्रम तसेच त्यांचे राजकीय तत्वज्ञानामध्ये दलित,श्रमिक, शेतक-यांच्या दास्यमुक्तीचा ध्येयवाद होता. १९३६ ते १९४२ या सहा वर्षाच्या काळात स्वतंत्र मजूर पक्षाने ऐतिहासीक कार्य केले जे वर्तमान आबेंडकरवादी पक्ष संघटनांना आणि साम्यवादी पक्ष संघटनांना मार्गदर्शक ठरणारे आहे. पक्ष स्थापनेनंतर महिन्याभरातच जाहीर झालेल्या १९३७ च्या मुंबई, मध्यप्रदेश व-हाड प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत भरघोश यश मिळवले. मुंबई विधिमंडळात अनेक महत्त्वपुर्ण प्रश्नांकडे शासनाचे लक्ष आकर्षित केले. राजकारण हे वर्गिय जाणीवेवर आधारीत असले पाहिजे वर्गिय जाणीवेशिवायचे राजकारण म्हणजे निव्वळ ढोंग होय. भारतातील भेदभावावर आधारलेल्या जाती व्यवस्थेला खिळ देवुन येथिल दलित, शेतकरी, कामगार वर्गांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्या लाल झेंड्याखाली एकत्रित आणले. साम्राज्यशाही, भांडवलशाही विरोधी लढतांना ब्राम्हणशाही विरुद्ध सुद्धा लढणे हे तितकेच आवश्यक आसते असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. स्वतंत्र मजूर पक्षाचे ध्येयधोरणे, उदिष्टे ही सर्व दलित, शेतकरी, कामगार वर्गांच्या हितसबंधाच्या सबंधित असल्याचे दिसून येते. हा पक्ष एक क्रांतिकारक पक्ष होता.

**जाहीरनामा व पक्ष कार्यक्रम:**–राजकीय सत्तेचा विचार करीत असतांना सुस्पष्ट ध्येय व उदिष्टे असणारा तसेच संघटनक्षम राजकीय पक्ष असणे अनिवार्य होते. त्याला अनुसरुनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 15 ऑगस्ट 1936 रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. भांडवलदार व जमीनदार वर्गाची सत्ता संपुष्टात आणावयाची झाल्यास फक्त अस्पृश्य समाजास सोबत घेवुन चालता येणार नाही, याची जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना होती म्हणून या पक्षात शोषित, पीडित, शेतकरी, कामगार, मजुर वर्गांना समाविष्ठ करुन घेतले व त्याला अनुसरुनच स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा व पक्ष कार्यक्रम निश्चित केला. व तो टाईम्स ऑफ इंडिया च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आला. नंतर 22 ऑगस्ट 1936 रोजी जनता वृत्तपत्राच्या च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आला. पददलितांच्या नेतृत्वात स्थापन झालेला किसान–मजूरांचा हा पहिलाच राजकीय पक्ष होय.

दि. 15 ऑगस्ट 1936 रोजी टाईम्स ऑफ इंडिया च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आलेली पक्षाची स्थापना व जाहीरनामा तसेच पक्ष कार्यक्रम या विषयीची माहिती पुढील प्रमाणे होती–

**INDEPENDENT LABOUR PARTY :** A new political party has been organized in Bombay for the purpose of contesting the elections in the Bombay Presidency under the new constitution to both chambers of the Legislature. It is known as the 'Independent Labour party' and has been formed by Dr. B.R. Ambedkar, thr depressed class leader.

It appears that originally Dr. Ambedkar's idea was to organize a party exclusively of the depressed classes. Its programme was specifically worded in term of



Scanned by CamScanner

the needs of these classes. But at the desire of his friends from other classes, he has consented to give a general name to the party and has worded the programme in more general terms. The party is open to anyone who wishes to stand for with the programme formulated for the purpose.

**BROD PROGRAMME :** In an interview with a representative of the Times of India, Dr.Ambedkar declared that having regard to the fact that the present was no time for the parties communally organized, he had in agreement with the wishes of his friends 'broadened the name and the programme of the party so as to permit political co-operation between the other classes and Depressed classes'. The nucleus of the party would still be the fifteen members of the Depressed classes. But members of the other classes were free to join the party.

Dr.Ambedkar added that the depressed classes possessed large voting strength in constituencies in which no seats reserved for them, and would be possible for them to place that voting strength at the disposal of any candidate, who cared to become a member of the party.

He made it clear that the party membership was open to persons of all creeds and communities, although the depressed classes votes could be reason of the law be made available to all persons belonging to such communities and creed as were include in the general electorate. Already some persons from other classes had expressed their willingness to join the party and who cared to take advantage of the opportunity might correspond with secretary of the party.

Questioned what cohesion the Independent Labour Party would have, Dr.Ambedkar pointed out that the Party was not going to be a miscellaneous collection of members of the Legislature, who after getting elected, each of his own, would be friend one another in the legislature, and agree to vote together. The party would have its roots in the electorate, and its member would have fought the election as such, would have pledged to the electorate to uphold a common and clearly defined programme and to be bound by the rules of discipline framed by the party.

**OPEN TO ALL :** Asked what promoted him to select that particular name for the party, Dr. Ambedkar explained that the party would be independent of every other political organization although it would be ready to co-operate with any other political party where co-operation was possible. The Party was a labour organization I the sense that its programme was mainly to advance the welfare of the labouring classes. The Party believes in having a correct ideology suited to the section of the people whose interests it regards as paramount. The word 'Laboure' is used instead of the words 'Depressed Classes' because laboure included the Depressed Classes as well.

**AIMS OF PARTY : Working the Constitution Desire Defects**

Explaining the programme of the party Dr. Ambedkar said that it had been formulated after mature consideration and in consultation with all those who were interested in it. So far as the constitution was concerned-

"The party recognizes that the new constitution is full of defects and faults, much short of full responsible Government. The party objects to several features of the provincial constitution, particularly the institution of the second chamber. All the same, the party believes in working the constitution. But while prepared to work the constitution, the party will strive to see that the special emergency and reserved power vested in the governor are not exercised in a manner which altogether nullifies the system of responsible Government.

**As regards the economics question :**

1)The party will undertake to establish Land Mortgage Banks, agriculturist producer's co-operative societies and marketing societies with a view to improve productivity of agriculture.

2)The party thinks that fragmentation of holdings is a severe handicap in the way of the application of capital and improved methods of cultivation to agriculture and is therefore a direct case of the poverty of the agriculturists.

**Pressure of Population :** The Party, however, believes that the fragmentation of holdings and the consequent poverty of the agriculturists as



Scanned by CamScanner

mainly due to the pressure of population on land, and unless the pressure is relieved by draining of the excess population subsisting on land, fragmentation will continue and condition of the agriculturists will remain as poverty-stricken, as it is today. In the opinion of the party, the principle means of helping the agriculturists and making agriculture more productive consists in the industrialization of the province. The party will, therefore Endeavour to rehabilitate old industries and promote such new industries as the natural resources of the province will permit.

1)To raise the efficiency and the productive capacity of the people the party will endeavour to undertake an extensive programme of technical education.

2)The party accepts the principle of state management and state ownership of industry wherever it may become necessary in the interest of the people.

3)The party will endeavour to remove all obstacles to free and full life and to alter, amend or abolish any economic system which is unjust to any class or section of the people.

4)The party will undertake legislation to protect agricultural tenants from the exaction and evictions by the landlords in general and in particular the tents under (a) Khoti system and(b) Talukdari system.

5)The party will endeavour to provide for the workers, agricultural as well as industrial, a minimum standard of living compatible with civilized life.

6)For the benefit of the industrial worker the party will endeavour to introduce legislation to control the employment, dismissal and promotion of the employees in factories, to fix hours of works, to make provision for the payment of adequate wages, for leave with pay, and as many amenities of life as possible and to provide payment to the workers of bonuses, pensions or other provisions of retirements from active works, on account of old age or other incapacity. The party will also introduce a scheme of social insurance which will provide the workers against sickness, unemployment and accident. The party will endeavour to provide cheap and sanitary dwellings for the workers.

7)For benefit of the agricultural workers the party will endeavour to extend to them the same benefits which is proposes to secure for the industrial workers with such modification as circumstances may require.

8)The party accepts the principal that it is the duty of state to relive unemployment, and the party will, therefore endeavour to carry out this obligation by introducing scheme of land settlement and by starting publics works to provide for the unemployed and the landless labours.

9)The party will undertake legislation to protect the debtor class for undue exaction, usurious dealings fraudulent transactions of the money-lenders and endeavour to tackle the problem of rural indebtedness.

10)The party will undertake legislation to afford adequate protection to the lower middle class in the matter of house rent in industrial centers in big cities and towns.

**Taxation problems :** The attitude of the party towards taxation is that 'it believes that for the improvement in well-being of the people, every government must undertake a large number of nation-building activities and that these activities can be undertaken only when a Government has money in its treasury this money come mainly from taxation levied on the people. A prosperous Government is the best guarantee of good Government.

The party thinks that to preach reduction of taxation as a principle and to tell the people that reduction of taxation even at the sacrifice of useful nation- building activities is in their interest, is to misguide the people and to deceive the poorer classes. This does not mean that the party wishes to keep the system of taxation as it is. On the contrary, the party sees great objection to the system of to the system if taxation now in operation. The party defibictely recognizes that the present system of taxation is unjust and weighs heavily on the poorer sections of the population. The party will endeavour to rectify this inequity in the general system of taxation. The party has great objection to the present system. of levying land revenue and it will undertake legislation to make it mere equitable and more elastic.'



Scanned by CamScanner

**Social Reform Legislation Plans :** With regard to social reforms **(1)** 'The party will undertake legislation for the advancement of all necessary social reforms (a) to prevent social reforms from being out casted by the orthodox and (b) penalize all forms of organized attempts at direct action such as terrorism and boycott to prevent individuals or classes from exercising the rights and liberties given to them by law.

2) The party will undertake legislation to regulate the administration of all public charities with a view to preventing the mismanagement and misapplication of the charity funds and so secure the use of any surplus that may be left over to the advancement of such secular purposes as education, etc.

3) The party will undertake legislation to deal with the problem of beggars and other destitute persons. The attitude of the party towards rural reconstruction is: (a) the party will endeavour to make village life cheerful by providing as many amenities of life as may be necessary for the object in view (b) the party will endeavour to improve village sanitation and housing introducing a scheme of village planning somewhat on the lines of town planning (c) the party will endeavour to establish village libraries, village halls, village radio station and rotary cinemas in order to modernize the outlook of the villager and to make him a progressive person.

**Education :** In matters of education (1) The party will give effect to the scheme of free and compulsory primary education. (2) The party will undertake a scheme of adult education so as to make all people literates. (3) The party will lay special emphasis on technical education. The party will endeavour to provide facilities for higher education in India and abroad by means of state funds to deserving persons from communities which are educationally backward. (4) The party will undertake legislation to reorganize the university education in the presidency by establishing regional universities and to make them teaching Universities. The party believes that this is the only remedy by which the curse of examination which has blasted the intelligence and effort of the student's population can be removed.

The attitude of the party towards the administration is (1) the party will endeavour to see that the administration is good, efficient and free from corruption. (2) To secure the end of goods and efficient administration the party will endeavour. (a) To secure the separation of judiciary from the executive and (b) to amend the Vatan system in a way suited to modern conditions. (3) The party will also endeavour to prevent the administration from becoming the monopoly of any single cast or community. Consistently with efficiency of administration, the party will endeavour to bring about a fair admixture of all castes and communities in the administration of the presidency.

जनता वृत्तपत्राच्या 22 ऑगस्ट 1936 च्या अंकात खालील प्रमाणे स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहिरनामा, आणि कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात आला होता.

**स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहिरनामा:** आगामी नवीन राजकीय सुधारणांन्वये मुंबई कायदेमंडळाच्या दोन्ही चेंबर्स मधिल निवडणुका लढवण्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी 'दि इंडिपेंडेंट लेबर पार्टी' या नवीन पक्षाची स्थापना केली असून या पक्षाचा कार्यक्रमही निश्चित केला आहे. प्रथमतः त्यांचा उदेश फक्त अस्पृष्य वर्गासाठीच स्वतंत्र पक्ष स्थापन करावा असा होता व त्या पक्षापुरताच व्यवहार्य असा मर्यादित कार्यक्रम त्यांनी ठरविला होता; पण हा मुळचा बेत बदलून या पक्षाला आता बहुसामान्य स्वरुपाचे नाव दिले आहे व त्याचा कार्यक्रमही त्या पक्षाला अनुरुप असा सर्वसाधारण स्वरुपाचा ठेवला आहे. या पक्षाला असे सर्वसामान्य स्वरुप देण्याचे कारण डॉ. साहेबांनी असे सांगितले की, अस्पृश्यतेतर वर्गातील त्यांच्या ब–याच स्नेहयांनी त्यांच्या. कार्यक्रमाला पुर्ण अनुमती दिली असून त्याप्रमाणे त्यांच्या पक्षातर्फे निवडणुकीला उभे राहण्याचे कित्येकांनी ठरविले आहे. अस्पृश्य व अस्पृश्यतेतर यांच्यामध्ये राजकीय बाबतीत तरी सहकार्य घडून येण्यास हा पक्ष उपकारक होईल हे उघड आहे. कारण ज्या मतदारसंघात अस्पृश्यवर्गाला राखीव जागा नाहीत, अशा पुष्कळ मतदारसंघात अस्पृश्यवर्गाचे मतदान बळ भरपुर आहे आणि या आपल्या मताधिकाराचा उपयोग या नविन पक्षातर्फे उभे राहणा–या कोणत्याही वर्गाच्या उमेदवाराला करुन घेता येईल. मात्र अस्पृश्यवर्गाला मिळालेल्या 15 जागा या पक्षातही कायम राहावयाच्या आहेत.



Scanned by CamScanner

अर्थात या पक्षाचे सभासद कोणासही होता येईल व साधारण मतदारसंघात अस्पृश्य मतदारांना मिळालेल्या हक्कानुसार ती मते कायदयाने पात्र असलेल्या उमेदवारांना देता येतील.

**कार्यक्रम :** स्वतंत्र मजूर पक्षाचे मुबंई कायदेमंडळात नवीन सुधारणांखाली आखलेल्या कार्यक्रमाचे साधारण स्वरुप पुढे दिल्याप्रमाणे आहे :—

**नवीन सुधारणांविषयी धोरण :** पक्षाचे असे मत आहे की, नवीन सुधारणांत भरपूर व्यंगे असल्यामुळे त्या पुर्ण जबाबदारीचे स्वराज्य प्राप्त करुन देण्यास असमर्थ आहेत. प्रांतिक कारभारातील कित्येक घटना,विशेषतः सेकंड चेंबरची घटना ही या पक्षाला आक्षेपार्ह वाटते. तथापी या नविन सुधारणा राबविण्यास हरकत नाही. मात्र जबाबदारीच्या स्वराज्याचे स्वरुप निष्पन्न करुन टाकण्याजोगे जे खास व अनियंत्रित स्वरुपाचे अधिकार गव्हर्नरास मिळालेले आहेत, त्याचा उपयोग या मुदतीत होऊ नये याबद्यल हा पक्ष जागृत राहील.

**1.आर्थिक धोरण :** 1.शेतीची प्रगती होऊन तो धंदा जास्त फलद्रुप व्हावा म्हणून लैंडमॉर्गेज बॅका, उत्पादक शेतकरी वर्गाच्या सहकारी पतपेढया व खरेदी विक्री करणा—या मंडळया (मार्केटिंग सोसायटीज) यांची स्थापना करण्याचा या पक्षाचा कार्यक्रम आहे. 2. शेतक—यांच्या दारिद्रयाचे प्रत्यक्ष कारण जमिनीची लहान लहान तुकडयात होणारी विभागणी हे आसून त्यामुळे तीत भांडवल गुतंवण्यास व सुधारलेल्या पद्यतीने शेती करण्यास वाव मिळत नाही असे या पक्षाचे मत आहे. जमिनीचे तुकडे आणि त्यामुळे शेतकरी वर्गात वावरणारे दारिद्रय यांचे मुख्य कारण म्हणजे वाढत्या लोकसंख्यला केवळ जमिनीवरच अवलंबुन रहावे लागते हे होय! आणि जमिनीवरच अवलंबुन राहण—या जादा लोकसंख्येची पोषणाची शेतीव्यतिरीक्त इतर व्यवसायात तजवीज लाविल्यावाचून शेतक—यांचे दारिद्रय हटणार नाही. या पक्षाचे असे मत आहे की, शेतक—यांना मदत करण्यासाठी आणि त्याची उत्पादन शक्ती वाढविण्यासाठी इलाख्यातील उद्योगधंद्याची वाढ करणे हे मुख्य साधन आहे. म्हणून हा पक्ष चालु उद्योगधंद्याना पुनर्जीवन करुन हया इलाख्यात उत्पन्न होणा—या कच्च्या मालाच्या अनुरोधाने नवीन उद्योगधंदे निर्माण करण्याचा प्रयत्न करील. 3. लोकांना आपापल्या धंद्यात प्राविण्य संपादन करण्यात आणि आपली उत्पादन शक्ती वाढविण्यास साधनीभूत होणा—या धंदे शिक्षणाचा विस्तृत कार्यक्रम हाती घेण्याचा हा पक्ष प्रयत्न करील. 4. लोकहिताच्या दृष्टीने आवयक अशा प्रसंगी देशातील उद्योगधंद्याची मालकी व व्यवस्था सरकारने आपल्याकडे घ्यावी, असे या पक्षाचे मत आहे. 5. जीवनाचा पूर्ण आणि स्वतंत्र उपभोग घेण्याच्या मार्गात उपस्थित होणा—या सर्व अडचणी नाहीशा करण्यासाठी जी आर्थिक पध्दती एखांद्या विशिष्ट वर्गाला किंवा जनतेच्या विभागाला अन्यायकारक होत असेल ती पध्दती बदलणे, सुधारणे किंवा नष्ट करणे हेही या पक्षाचे अंगिकृत कार्य आहे. 6. सर्वसाधरणपणे जमीनदारांकडून होणारी शेतकरी कुळांची पिळवणूक अगर त्यांजकडून जमिनीचे भागलेपण काढून घेण्याची जमीनदारांची प्रवृती—विशेषतः (1) खोती व (2) तालुकदारी या पध्दतीत असणारी ही प्रवृती शेतक—यांच्या हिताला विरोधी असल्यामुळे त्यापासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे, अशा स्वरुपाचे कायदे करण्याचा प्रयत्न हा पक्ष करील. 7. शेतकरी वर्ग व कामगार वर्ग यांना सुधारलेल्या राहणीमाना प्रमाणे राहता यावे यासाठी त्यांच्या मशाहि—याची किमान मर्यादा ठरविण्याचा प्रयत्न हा पक्ष करेल. 8. कारखान्यातील कामगार वर्गाच्या हितासाठी कारखान्यातील नोकरी, बडतर्फी व पगारवाढ यांजवर सरकारी नियंत्रण, कामाचे जास्तीत जास्त तास, कामास योग्य असे वेतन, पगारी रजा वगैरे स्वरुपाच्या उपकारक योजना व वृध्दपण अगर दुसरे योग्य कारण यामुळे कार्यनिवृत्त होतांना बोनस, पेन्शन अगर तशाच प्रकारची दुसरी मदत अशासाठी कायदेमंडळात कायदे मंजूर करुन घेण्याचे प्रयत्न हा पक्ष करील. आणि आजारीपण, बेकारी किंवा अपघात अशा प्रसंगी कामगारांची तरतुद करणारी विम्याची खासगी योजना व कामगारांसाठी स्वस्त भाडयाच्या आरोग्य इमारतीची उभारणी ही कामे हाती घेण्याचा प्रयत्न हा पक्ष करील. 9. कारखान्यातील कामगार वर्गाच्या हितासाठी आवश्यक जसे काम हा पक्ष करणार आहे तसेच कार्य शेतक—यांच्या हितासाठी आवश्यक अशा स्वरुपात करेल. 10. बेकारी निवारण करण्याची जबाबदारी सरकारवर आहे हे तत्व या पक्षाला कबूल आहे व त्यासाठी शेतकी वसाहती व जमीन नसणा—या व बेकार कामगारांना काम मिळण्यासाठी सरकारी कामे सुरु करण्याच्या



Scanned by CamScanner

योजना आमलात आणण्याचा प्रयत्न हा पक्ष करील. 11. जबर व्याज, खोटे व घोटाळयाचे व्यवहार करणा–या सावकारापासून गरीब ऋणकाचे संरक्षण होण्यासाठी व शेतक–यांना ऋणमुक्त करण्यासाठी योग्य असे कायदे घडवून आणण्याचा हा पक्ष प्रयत्न करील. 12. मोठमोठया शहरातील व औद्योगिक कारखान्यांच्या भगात पडणा–या मध्यम स्थितीतील लोकांना सोईस्कर असे घरभाडे पडावे अशा प्रकारचे कायदे हा पक्ष पुढे मांडील.

**2.कर–धारा पद्यतीविषयी या पक्षाचे धोरण :** या पक्षाचे असे मत आहे की, प्रजेचे कल्याण व वाढता उत्कर्ष होण्यास सरकारने राष्ट्रसंवर्धक असे अनेक कार्यकम हाती घेतले पाहिजेत. पण सरकारच्या हाती पैसा असला तरच या गोष्टी सरकारला करणे शक्य होईल. हा पैसा अर्थात प्रजे कडून कराच्या रुपाने यावयाचा. भरपूर पैसा असेल तर सुराज्याची हमी घेता येते. कर कमी झाला पाहिजे आणि तो राष्ट्रोन्नतीला पोषक अशी कार्य करता न आली तरीही कर कमी झाला पाहिजे; तरच त्यात तुमचे हित आहे.' या मताचा प्रचार बहुजनसमाजात करणे अज्ञ व गरीब जनतेची दिशाभूल करून फसवणूक करण्यासारखे होय. तथापि कर–धारा पद्यती आहे ती राहू द्यावी असे हा पक्ष म्हणत नाही; एवढेच नव्हे, तर चालू पद्यत या पक्षाला नापसंत आहे; कारण ती अन्याय असून गरीब वर्ग त्यात चुरडून जात आहे. ही वीषमता दूर करण्याचा प्रयत्न हा पक्ष करील. चालू जमीनधारा पद्यती अत्यंत आक्षेपार्ह असून ती सुधारण्याविषयी या पक्षाचे प्रयत्न सुरु होतील.

**3.सामाजिक सुधारणा :** 1.सर्व प्रकारच्या आवश्यक अषा सामाजिक सुधारणा म्हणजे (अ) सनातन्यांकडून समाजसुधारकावर पडणा–या बहिष्कारास आळा घालणे, (ब) लोकांना कायद्याने मिळालेले हक्क व जीवन स्वातंत्र्य यांचा उपभोग घेणा–या काही व्यक्तीला अगर विशिष्ट वर्गाला दहशत अगर बहिष्कार घालण्यासारखे प्रयत्न कायद्याने शिक्षेस पात्र ठरविणा–या कायद्याची योजना. 2. धार्मिक द्रव्यनिधीचा दुर्विनियोग अगर गैरव्यवस्था होऊ नये यासाठी सार्वजनिक धर्मदायिक संस्थावर सरकारी नियंत्रण ठेवणारे कायदे करणे आणि या द्रव्यनिधीतुन संकल्पित विनीयोग होऊन शिल्लक राहिल्यास त्याचा शिक्षणासारख्या लौकिक कार्यात उपयोग करता येणारे कायदे करणे.

**4.ग्राम–संघटना -** ग्राम–संघटनेच्या दृष्टीने आवश्यक अशी सुखाची राहणी ग्रामीण जीवनात प्राप्त व्हावी .यासाठी शक्य त्या उपायांची योजना. 2. सामान्यतः नगररचनेच्या पध्दतीवरच खेडयांची रचना आसावी, अशा प्रकारच्या योजनेने खेडयातील घरे बांधून आरोग्य सुधारणे. 3. खेडयात वाचनालये, सार्वजनिक हॉल, रेडिओ, फिरते सिनेमा यांची योजना करुन जनपदांची विचार परंपरा उत्कांत व प्रयत्नशील करणे.

**5.शिक्षण : -**मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अमलात आणणे. 2. सर्वसाधारण साक्षरता प्रसारासाठी अशिक्षित प्रौढ मनुष्यांच्या शिक्षणाची योजना. 3.औद्योगिक शिक्षणावर विशेष भर देणे. 4.शिक्षणास मागासलेल्या जातीतील होतकरु तरुणांत हिंदुस्थानात व परदेशात उच्च शिक्षण घेता येण्यासाठी सरकारी मदत मिळेल अशी कायदेशीर योजना करणे. 5. इलाख्यात आवश्यक भागात प्रत्यक्ष शिक्षण देणारी प्रादेशिक विश्वविद्यालय स्थापन करुन विश्वविद्यालयीन शिक्षणाची पुर्नघटना करण्याचे कायदे हा पक्ष पुढे आणील. विद्यार्थ्यांचे श्रम व त्यांची बुध्दिमता मातीमोल करुन टाकणा–या परीक्षांची प्रस्तुतची अनिष्ट पध्दती नष्ट करण्याचा या पक्षाच्या मते हा एकच उपाय दिसतो.

6. **राज्यकारभार:** 1.राज्यकारभाराची पध्दती सक्षम इष्ट परिणामकारक व दोषरहित चालावी, असे या पक्षाचे प्रयत्न चालु राहतील. 2. वरील नं 1 पोट कलमातील उद्येशासाठी हा पक्ष (अ) न्याय व अंमलबजावणी खात्याची फारकत करणे, व (ब) आधुनिक परिस्थितीला अनुरुप अशी वेतन पध्दत योजणे,या दोन योजना हाती घेईल (३) सरकारी नोकरीत एके ठिकाणी एकाच जातीचा अगर वर्गाचा भरणा होऊ नये असे या पक्षाचे धोरण आहे. राज्यकारभार परिणामकारक होण्याकरीता इलाख्यातील सरकारी नोकरीत सर्व जाती व वर्ग यास योग्य प्रमाणात प्रवेश मिळेल, असे प्रयत्न हा पक्ष करील.

अस्पृश्यांखेरीज इतर वर्गातील ब–याच लोकांनी या पक्षाला मिळण्याची आपली इच्छा व्यक्त केली आहे. ज्यांना कोणाला या संधीचा फायदा घेण्याची इच्छा असेल,त्यांनी 'सेकटरी, इंडिपेंडेंट लेबर पार्टी दामोदर हॉल, पोयबावाडी, परेळ मुंबई याजकडे पत्रव्यव्हार करावा.



Scanned by CamScanner

**निष्कर्षः–** स्वतंत्र मजुर पक्षाचा जाहीरनामा सर्वसमावेशक दिसतो. तत्कालीन व वर्तमान राजकीय पक्षांना मार्गदर्शक असा स्वतंत्र मजुर पक्षाचा जाहीरनामा व पक्ष कार्यक्रम आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गरीब वर्गातील लोकांना संघटीत चळवळ करता यावी, यासाठी या पक्षाची स्थापना केली होती, या पक्षात अस्पृश्य जाती बरोबरच इतर जातीतील शेतकरी, कामकरी, शेतकरी कुळे, मध्यम वर्गातील नोकरीपेशाचे लोक आणि किरकोळ व्यापारी उदिम लोक यांच्या योग्य हितसंबधाचे रक्षण करुन त्यांना विशेष हक्क व सवलती मिळवून देणे हा या पक्षाचा उद्येश आहे.

सर्वसामान्य लोकांच्या आरोग्यापासून ते त्यांच्या आर्थिक उत्पादनांच्या साधनाबाबत हा पक्ष जागरुक भूमिका घेतो. शेतकरी, कुळे व शेतमजूर विशेषतः खोती आणि तालुकादारी कुळे यांच्या हितसंबधाचे संरक्षण करणे. कामगारांच्या मजूरीची किमान मर्यादा ठरवून देणे, कामाचे तास कमी करणे, नोकरीची शाश्वती, योग्य वेतन, पगारी रजा, पेन्शन, बेकारी भत्ता, आरोग्यशीर निवास इत्यादी आवश्यक बाबींची कायदेशीर तरतूद करणे. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी योग्य ती खबरदारी जाहीरनाम्यात घेतलेली आहे. शिक्षण ही बाब महत्वाची मानून मोफत शिक्षणाच्या माध्यमातून सर्व त्या शिक्षणाची सोय हा पक्ष करेल. राज्यकारभाराची पध्दती सक्षम इष्ट परिणामकारक व दोषरहित चालावी, असे या पक्षाचे प्रयत्न चालु राहतील, सुखाची राहणी ग्रामीण जीवनात प्राप्त व्हावी यासाठी योग्य ग्राम संघटनांची निर्मीती करणे, जनतेची व राष्ट्राची प्रगती होईल आशी कर धारा पध्दतीची निर्मीती करणे, या सारख्या अत्यंत महत्वपुर्ण विषयाचा समावेश या पक्ष्याच्या जाहीरनाम्यात व पक्ष कार्यक्रमात दिसून येतो.

**संदर्भसूची**

१.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे–खंड 2 , संपादक प्रदिप गायकवाड, क्षितिज पब्लिकेशन, डॉ.बाबासाहेब कॉलनी, लष्करीबाग,नागपूर–2003

2.डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड–7, चांगदेव भगवानराव खैरमोडे, सूगावा प्रकाशन,पुणे–2011

3.डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, संपादक मंडळ–दया पवार (निमंत्रक) प्रा. केशव मेश्राम, प्रा. बा.ह. कल्याणकर, वामन निंबाळकर, डॉ. एस.एस. भोसले, अर्जुन डांगळे, हरि नरके. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई–1999

Scanned by CamScanner